MHST200028752020

## वि.दि.दा.क्र.५६०/२०२३ मधील निशाणी क्र.९७ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज दावा काढुन टाकणेस ठेवणेचा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा वाटप व निरंतर ताकीद मिळणेकामी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुतकामी वादींना वारंवार पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी कोणतीही तजवीज न केल्यामुळे सदरचा दावा काढुन टाकणेच्या आदेशावर ठेवणेत आला व तसा आदेश दि.२२.०४.२०२५ रोजी पारीत करणेत आला. त्यानंतर वादी यांनी मुदतीचा कोणताही अर्ज अभिलेखावर दाखल केल्याचे दिसुन येत नाही व दावा काढुन टाकणेस ठेवणेचा आदेश रद्द करणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दि.०२.०७.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. दावा हा खारीज करणेत आलेला नाही. तसेच न्यायाचे दृष्टीने वादींना त्यांचा पुरावा देण्याची संधी देणे योग्य राहील असे मला वाटते. तसेच तशी संधी नाकारल्यास वादींवर अन्याय होईल. उलटपक्षी, वादींना संधी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दावा सन २०१७ चा असुन ८ वर्षे जुना आहे. दाव्याचे कामकाजास जो विलंब झालेला आहे त्याची भरपाई खर्चाची रक्कम देवुन करणे शक्य आहे. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## <u>आदेश</u>

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/- (रु. पाचशे फक्त) प्रतिवादी क्रं.२ व ३ यांना दयावी.

३) वरील पुर्तता झाल्यानंतर वादींविरुद्ध दावा खारीज करणेकामी ठेवणेचा आदेश रद्द करणेत येत आहे.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.10.07 17:48:41 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : ०३.१०.२०२५

(ए. ए. पाचरण)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वाई.